महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०
ई-मेल - desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

अतितात्काळ/कालमर्यादीत

क्रमांक : १०/एनजीपी/ शा.वि.सं.ब./२०२०/ ४६७ दिनांक 29 JUL 2020

प्रति,

प्राचार्य,

सर्व शासकीय, शासकीय अनुदानित व

विद्यापीठ व्यवस्थापित आणि विद्यापीठ संस्था,

(अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र पदविका संस्था)

(स्वायत्त संस्था वगळून)

विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये शासकीय व शासन अनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र इ.पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम बदल, तसेच पहिल्या व दुसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत......

संदर्भ: १. शासन निर्णय क्र.मान्यता-२०१९/(प्र.क्र.७७/१९)/तांशि-५, दिनांक १७ मे २०१९

२. शासन निर्णय क्र.मान्यता-२०२०/(प्र.क्र.३९/२०)/तांशि-५, दिनांक २२ जुलै २०२०

३. अभातंशिप, नवी दिल्ली यांचे पत्र.क्र.ओआयसीटीई/ओबी/ॲकॅडेमिक कॅलेंडर/२०२०-२१, दि. ०७.०७.२०२०

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी संदर्भ क्रमांक ३ नुसार सुचित केल्यानुसार विद्यमान विद्यार्थ्यांसाठी शै.व. २०२०-२१ चे शैक्षणिक सत्र दि. १७.०८.२०२० पासून सुरु करावयाचे आहे. संचालनालयाच्या अधिपत्याखालील पुर्णवेळ पदविका तांत्रिक पाठ्यक्रमाच्या प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्षाचे (अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, औषधनिर्माणशास्त्र) नियम संदर्भ क्रमांक १ व २ अन्वये प्रसिध्द करण्यात आले आहेत. पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम बदल, तसेच पहिल्या व दुसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्यास संदर्भीन शासन निर्णयामधील नियम क्र. १६ अन्वये तरतूद करण्यात आलेली आहे. सबब सदर नियमाच्या आधारे शासकीय व शासन अनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र या पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या संस्था बदल, शाखा बदल इ. बाबत खालील प्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात येत आहेत.

१. प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर, पाठयक्रम किंवा पाळी बदलण्याची विनंती करणाऱ्या इच्छुक विद्यार्थ्यांना जागांच्या उपलब्धतेच्या अधीन राहून त्याच संस्थेत तसे बदल करण्याची तरतूद असून

सदर बदल प्रथम वर्षाच्या किंवा प्रथम व व्दितीय सत्रांच्या एकत्रित गुणांच्या आधारे करावयाचे आहेत. तरी, आपल्या संस्थेतील ज्या विद्यार्थ्यांनी प्रथम वर्षानंतर पाठयक्रम / पाळी बदलाकरीता अर्ज / विनंती केली आहे अशा विद्यार्थ्यांना जागांच्या उपलब्धतेनुसार प्रथम वर्षातील गुणवत्तेच्या आधारे प्राधान्य निश्चित करुन आपले स्तरावरुन (संस्था स्तरावरुन) नियमाचे काटेकोरपणे पालन करुन मान्यतेची कार्यवाही दि. १०.८.२०२० पर्यंत करावी.

२. एका शासकीय, शासन अनुदानित व विद्यापीठ संचलित तंत्रनिकेतनातून दुस-या शासकीय, शासन अनुदानित व विद्यापीठ संचलित तंत्रनिकेतनामध्ये पहिल्या व दुसऱ्या वर्षानंतर संस्था बदलाची तरतूद करण्यात आलेली आहे. म्हणून आपल्या तंत्रनिकेतनामधील जे विद्यार्थी इतर शासकीय व शासन अनुदानित संस्थेत (स्वायत्त संस्था वगळून) बदलीसाठी इच्छुक आहेत, अशा विद्यार्थ्यांना संदर्भ क्रमांक १ व २ मधील बदलीबाबतचे नियम निदर्शनास आणून दयावेत. आपल्या संस्थेतील जे विदयार्थी इतर शासकीय व शासकीय अनुदानित संस्थेत बदलीसाठी आपणाकडे अर्ज करतील अशा सर्व विद्यार्थ्यांची बदली बाबत त्यांनी दिलेली कारणे (वैद्यकीय, आर्थिक अडचण, वडिलांची/पालकांची बदली इत्यादी) नमूद करुन विदयार्थ्यांची नांवे गुणानुक्रमाने एकत्रितरित्या सोबत जोडलेल्या "Annexure B" मध्ये Microsoft Excel sheet मध्ये भरुन समर्पक कारणे व विद्यार्थ्यांचे दोन्ही अभ्यासक्रमाचे Choice Code No. भरुन आपल्या शिफारशी **दिनांक ११ ऑगस्ट, २०२० पूर्वी** या संचालनालयास सादर करण्यांत याव्यात. तसेच desk10@dtemaharashtra.gov.in या ई-मेल वर सदर माहितीची Soft copy सुध्दा उपलब्ध करुन द्यावी.

३. अ.क्र. २ नुसार विद्यार्थ्यांचे संस्था बदलाचे प्रस्ताव सादर करतांना या पत्रासोबतच्या "Annexure A" च्या नमुन्यात विद्यार्थ्यांचा विनंती अर्ज, गुणपत्रिकांची साक्षांकीत प्रत, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांचे पात्रता प्रमाणपत्र (आवश्यकतेनुसार), शिक्षणात खंड असल्यास त्याबाबत प्राचार्यांचे प्रमाणपत्र किंवा रु. १००/- च्या स्टँप पेपरवर प्रतिज्ञापत्र, प्रथम वर्ष किंवा द्वितीय वर्ष प्रवेशाचे ॲलॉटमेंट लेटर (उपलब्ध असल्यास) व संस्था बदलीच्या कारणाच्या पुष्टर्थ पुरावे, इ. दस्तावेजाची आपले स्तरावरुन पडताळणी करून तूर्तास desk10@dtemaharashtra.gov.in या ई-मेल पाठविण्यात यावीत. कोविड १९ या साथरोगामुळे असलेली टाळेबंदी समाप्त झाल्यानंतर प्रस्तावाची हार्ड कॉपी संचालनालयास सादर करावी.

४. विद्यार्थ्यांना, कोणत्याही टप्प्यावर स्वायत्त संस्थांमध्ये/संस्थांमधून संस्थाबदल अनुज्ञेय नाही अशी स्पष्ट तरतूद संदर्भ क्रमांक १ व २ अन्वये निर्धारीत केलेल्या नियमात असल्याची बाब संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावी व असे अर्ज आपल्या स्तरावरुन निकाली काढण्यात यावेत.

५. बदली मागितलेल्या विद्यार्थ्यास या संचालनालयाचे आदेश प्राप्त झाल्यानंतरच लिव्हींग सर्टीफीकेट द्यावे व कोणत्याही परिस्थितीत तत्पुर्वी ते देण्यात येवू नये. तसेच संबंधित विद्यार्थ्यांच्या संस्था बदलीसाठी केवळ ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित केल्याच्या कारणास्तव त्याचे संस्थेतील प्रवेश रद्द करु नये. तसेच संस्थेतील सर्व बदली इच्छुक विद्यार्थ्यांची गुणवत्तेच्याक्रमाने यादी तयार करतांना सदरहू विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा प्रकार सुपरन्युमरी कोटयातील आहे किंवा कसे? याच्या तपशीलासह व आपल्या शिफारशीसह या कार्यालयास सादर करावी व या संदर्भात कोणत्याही विद्यार्थी व पालकांस या प्रकरणी संचालनालयास संपर्क साधण्यास सूचित करू नये.

६. जे विद्यार्थी विनाअनुदानित शैक्षणिक संस्थेत संस्था बदलीसाठी विनंती करतील अशा विद्यार्थ्यांना विनाअनुदानित संस्थेतील विद्यार्थ्यांसाठी संस्था बदलीचे निर्गमित केलेले परिपत्रक क्रमांक क्र. १०/एनजीपी/वि.स.ब./२०२०/४६२ व ४६३, दि. २८.०७.२०२० अन्वये निर्धारीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार अर्ज करण्यास आपले स्तरावरुन सूचित करावे.

येथे असेही नमूद करण्यात येते की, समर्पक कारणे व आपल्या ना-हरकत प्रमाणपत्राशिवाय विद्यार्थ्यांच्या अर्जावर कोणतीही कार्यवाही करण्यांत येणार नाही. तसेच द्वितीय वर्षाची अभ्यासक्रमनिहाय रिक्त जागांची माहिती सोबतच्या "Annexure C" मध्ये सादर करावी. विद्यार्थी ज्या संस्थेत व अभ्यासक्रमात शिकत आहे व ज्या संस्थेत बदली मागितलेली आहे, त्या संस्थेच्या नांवासमोर इन्स्टीटयुट कोड, अभ्यासक्रमाचे नांव व चॉईस कोड नमूद करण्यांत यावा. तसेच याबाबतची माहिती आपल्या शिफारशीसह निश्चितपणे दि. १२.०८.२०२० पर्यंत या संचालनालयास प्राप्त होईल अशा बेताने पाठवावी, तद्नंतर आलेली प्रकरणे व माहितीचा विचार करण्यात येणार नाही अशी प्रकरणे दप्तरी दाखल केली जातील याची नोंद घ्यावी.

(डॉ. अभय वाघ)
संचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.